## अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. ४३/२०२३**
**निशाणी क्र. ४५**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. बाभुळगाव** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**शेख राहील** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ४** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | शेख हफीज शेख अब्बास |
| वय अंदाजे ५६ वर्षे | धंदा- नौकरी, वाहन चालक, तहसिल कार्यालय, बाभूळगाव. |
| राहणार | यवतमाळ, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०२२ मध्ये मी तहसिल कार्यालय बाभूळगाव येथे वाहन चालक म्हणून कार्यरत होतो. त्यावेळेस तहसिलदार कुमरे साहेब हे होते.

२. दिनांक १०/१२/२०२२ रोजी मला कुमरे साहेबांनी तहसिल कार्यालय, बाभूळगाव येथे बोलवले होते. मला त्यांनी रेती घाटावर जाण्यासाठी बोलवले होते. त्यानंतर मी, तहसिलदार श्री. कुमरे व गोपाल कावलकर असे तिघे काशी घाट येथे गेलो. आम्ही काशी घाट येथे जाण्याकरीता सकाळी ११.१५ वाजता बाभूळगाव तहसिल कार्यालयामधून निघालो. त्यावेळी आम्ही काशी घाट येथे गेल्यावर, आम्हाला दोन ट्रॅक्टर व त्यामध्ये अवैध रेती होती. त्यापैकी एक ट्रॅक्टर शेख छोटू व दुसरे ट्रॅक्टर शेख राहील शेख युनूस यांचे होते. त्यानंतर श्री. कुमरे ट्रॅक्टर जवळ गेले. त्यावेळी गोपाल कावलकर यांनी पंचनामा तयार केला. त्यानंतर श्री. कुमरे यांनी ट्रॅक्टर चालकांना म्हटले की ट्रॅक्टर तहसिल कार्यालयामध्ये घेवून चला. त्यानंतर त्या चालकांनी घाटामधून ट्रॅक्टर बाहेर काढले. त्यानंतर विरखेड फाट्यावर शेख राहील शेख युनूस याने आमच्या वाहनासमोर त्याचे दूचाकी वाहन उभे केले. त्यानंतर शेख राहील शेख युनूस हा श्री कुमरे यांच्या जवळ आला व त्याने त्याच्या

पॅन्टच्या खालून एक चाकू काढला व त्याने तहसिलदार साहेबांना धमकी दिली की ''तुमको यहा रहनेका है क्या, तुमको भी फॅमीली है, तुमको भी बच्चे है, मेरी गाडी छोड दो, नही तो मै तुमको देख लूंगा''. त्यानंतर साहेबांनी ट्रॅक्टर चालकाला समजून सांगीतले व त्यानंतर त्या चालकाने गाडी तहसिल कार्यालयामध्ये आणली. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. मी आरोपी शेख राहील शेख युनूस याला ओळखतो. जर आज आरोपी न्यायालयात हजर असते, तर मी त्यांना ओळखू शकलो असतो.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. इमरान देशमुख यांचे मार्फत सुरु –</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की माझे बयान बाभूळगाव येथील न्यायदंडाधिका–यांसमोर झाले होते. ते बयान आता मला दाखवले, ते तेच आहे व त्यावर तत्कालीन न्यायदंडाधिकारी यांची सही आहे व ते बयान **निशाणी क्रमांक ४६ वर आहे**. मुस्लीम समाजामधील प्रचलीत नावे मला माहीत आहे. रहिम, राहिल, राहिम ही नावे वेगवेगळी आहे व या तिन्ही नावाच्या व्यक्ती वेगवेगळया असू शकतात. माझे कलम १६४ अंतर्गत नोंदवलेले बयान (निशाणी क्रमांक ४६) हे मला त्यावेळेसच्या न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बाभूळगाव यांनी वाचून दाखविले होते व ते बरोबर असल्याचे मी मान्य केले. कलम १६४ चे बयानामध्ये (निशाणी क्रमांक ४६) शेख राहील शेख युनूस हे नाव नमूद केलेले नाही.

४. कलम १६४ च्या बयानामध्ये मी असे सांगीतले होते की *त्या चालकांनी घाटामधून ट्रॅक्टर बाहेर काढले. मात्र ही बाब त्या बयानामध्ये का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.*

पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगीतले नव्हते की **दूचाकी वाहन** उभे केले. साक्षीदार स्वतः सांगतात की **वाहन** उभे केल्याचे त्यांनी सांगीतले होते. असे घडले नाही की मी कलम १६४ चे बयान देतेवेळी राहीम शेख हे नाव सांगीतले होते. असे घडले नाही की मी कलम १६४ चे खोटे व चूकीचे बयान दिले. कलम १६४ च्या

बयानामध्ये राहीम शेख याचे नाव लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीस बयान वाचून शेख राहील शेख युनूस हे नाव खोटे सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की शेख राहील शेख युनूस या नावाच्या व्यक्तीने कोणताही गुन्हा केला नाही व तो घटनास्थळावर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे त्याचे नाव कलम १६४ च्या माझ्या बयानामध्ये नाही.

५. श्री कुमरे हे माझे वरिष्ठ अधिकारी आहे व त्यांच्या सूचना व आदेशांचे पालन मला करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझे बयान दिनांक १२/१२/२०२२ रोजी घेतले होते व माझे बयान पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की श्री. कुमरे यांनी मला व इतर लोकांना पोलीस स्टेशनमध्ये जावून बयान देण्याबाबत सांगीतले होते.

६. हे म्हणणे खरे आहे की शासकीय वाहनाचे लॉगबूक ठेवल्या जाते व तसे लॉगबूक मी ठेवलेले आहे. मी शासकीय वाहनाच्या लॉगबूकची प्रत पोलीसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की विरखेड फाट्यापासून तहसिल कार्यालय बाभूळगाव चे अंतर पाच किलोमिटर आहे. हे म्हणणे खरे नाही की मी विरखेड फाट्यावर शासकीय वाहनाने गेलो नसल्यामुळे लॉगबूकची प्रत मी पोलीसांना दिली नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी सांगत आहे की *"दिनांक १०/१२/२०२२ रोजी मला कुमरे साहेबांनी तहसिल कार्यालय, बाभूळगाव येथे बोलवले होते. मला त्यांनी रेती घाटावर जाण्यासाठी बोलवले होते. त्यानंतर मी, तहसिलदार श्री कुमरे व गोपाल कावलकर असे तिघे काशी घाट येथे गेलो. आम्ही काशी घाट येथे जाण्याकरीता सकाळी ११.१५ वाजता बाभूळगाव तहसिल कार्यालयामधून निघालो. त्यावेळी आम्ही काशी घाट येथे गेल्यावर, आम्हाला दोन ट्रॅक्टर व त्यामध्ये अवैध रेती होती. त्यापैकी एक ट्रॅक्टर शेख छोटू व दुसरे ट्रॅक्टर शेख राहील शेख युनूस यांचे होते. त्यानंतर श्री कुमरे ट्रॅक्टर जवळ गेले. त्यावेळी*

*गोपाल कावलकर यांनी पंचनामा तयार केला. त्यानंतर श्री कुमरे यांनी ट्रॅक्टर चालकांना म्हटले की ट्रॅक्टर तहसिल कार्यालयामध्ये घेवून चला. त्यानंतर त्या चालकांनी घाटामधून ट्रॅक्टर बाहेर काढले. त्यानंतर विरखेड फाट्यावर शेख राहील शेख युनूस याने आमच्या वाहनासमोर त्याचे दूचाकी वाहन उभे केले. त्यानंतर शेख राहील शेख युनूस हा श्री कुमरे यांच्या जवळ आला व त्याने त्याच्या पॅन्टच्या खालून एक चाकू काढला व त्याने तहसिलदार साहेबांना धमकी दिली की ''तुमको यहा रहनेका है क्या, तुमको भी फॅमीली है, तुमको भी बच्चे है, मेरी गाडी छोड दो, नही तो मै तुमको देख लूंगा''. त्यानंतर साहेबांनी ट्रॅक्टर चालकाला समजून सांगीतले व त्यानंतर त्या चालकाने गाडी तहसिल कार्यालयामध्ये आणली''.*

८. हे म्हणणे खरे नाही की श्री कुमरे हे माझे वरिष्ठ असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीची खोटी ओळख दाखवत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – ०२/०२/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.